सकाळ

**Sakal Marathi -** 12 July 2017

'सुपरवासी' संस्थेमुळे टळले कायमचे अंधत्व; शस्त्रक्रिया यशस्वी

# येऊरच्या अनिता हडळला मिळाली नवी दृष्टी!

**श्रीकांत सावंत : सकाळ वृत्तसेवा**

ठाणे, ता. ११ : ठाण्यापासून हाकेच्या अंतरावरील येऊरच्या आदिवासी पाड्यांत राहणाऱ्या नागरिकांना रोजचे जीवन जगताना काहीना काही समस्यांना तोंड द्यावे लागते. घनदाट जंगलातील या विरळ लोकवस्तीतून निघणारा आदिवासींचा 'हुंकार' शहरातील गोंगाटात कुणाला ऐकूच जात नाही; मात्र दुर्घटनेमुळे कायमचे अंधत्व येण्याची शक्यता असताना अनिता हडळ (वय ११) हिच्या वेदना सुदैवाने 'सुपरवासी' या सामाजिक संस्थेपर्यंत पोहचल्या. उपचारासाठी संस्थेने तत्काळ हालचाली केल्या. शस्त्रक्रियेनंतर अनिताला पुन्हा दृष्टी मिळाली.

वडिलांचे छत्र हरपलेली अनिता येऊरच्या जंगलातील आदिवासी पाड्यात आईसह कुडाच्या खोपटीत राहते. आईच्या सततच्या आजारपणामुळे घरातील जबाबदाऱ्या सांभाळत अभ्यासाकडेही अनिता लक्ष द्यायची. मेमध्ये घराबाहेर खेळताना अनिताच्या डोळ्यात काटा घुसला. रक्तबंबाळ झाल्यानंतरही न घाबरता अनिताने स्वतःच डोळ्यातून काटा काढला; मात्र गैरसोई आणि आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेता न आल्याने तिच्या डोळ्याची जखम वाढत गेली. महिनाभरात तिला त्या डोळ्याने दिसणे बंद झाले. आधीच अठराविश्व दारिद्र्य, त्यात दृष्टी गेल्याने होतकरू अनिता हेच 'नशीब' मानून त्याच जिद्दीने जगू लागली.

परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या अपूर्वा आगवण यांच्या 'सुपरवासी' संस्थेतील स्वयंसेविकांना अनितासंदर्भात माहिती मिळाली. अनिताला तत्काळ संस्थेच्या कार्यालयात नेण्यात आले. संस्थेच्या डॉक्टरांनी तिच्या डोळ्यांची तपासणी केली. आगवण यांनी अनितावरील शस्त्रक्रियेसाठी सोशल मीडियाद्वारे ठाण्यातील नागरिकांना मदतीकरता हाक दिली. ठाण्यातील रामकृष्ण नेत्रालयाचे डॉ. नितीन देशपांडे यांनी या मुलीच्या उपचारासाठी तत्काळ होकार दिला. अपूर्वा यांच्या प्रयत्नातून २५ हजारांची मदत उभी राहिली आणि २३ जूनला अनिताच्या डोळ्यावर यशस्वी शस्त्रक्रिया झाली.



ठाणे : शस्त्रक्रियेनंतर अनिता हडळ.

## नवे आयुष्य

**शस्त्रक्रियेनंतर अनिता सुपरवासी संस्थेच्या कार्यालयात पोहचली. उपचारानंतर आवश्यक देखभालीकरता अनिता आठ दिवस संस्थेच्या कार्यालयातच मुक्कामाला होती. या कालावधीत तेथील स्वयंसेविकांनाही अनिताचा लळा लागला होता. सुपरवासी संस्थेच्या प्रयत्नामुळे अनिताला नवे आयुष्य मिळाल्याने तिच्या आईने समाधान व्यक्त करत संस्थेला धन्यवाद दिले.**